# नांदेड पोलीस दलातील दोन पोलीस अधिकारी व एक पोलीस अंमलदार यांना राष्ट्रपती पोलीस पदक

दै. प्रजावाणी २५/०३/२०२२





नांदेड :

नांदेड पोलीस दलातील दोन पोलीस अधिकारी व एक पोलीस अंमलदार यांना मा. राज्यपाल श्री भगतसिंह कोश्यारी, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे हस्ते राष्ट्रपती पोलीस पदक प्रदान सोहळा दिनांक २१ मार्च रोजी दरबार हॉल राजभवन मुंबई येथे आयोजीत करण्यात आला होता. दोन पोलीस अधिकारी व एक पोलीस अंमलदार यांच्या उत्कृष्ट व उल्लेखनिय कामगीरी बदल पोउपनि श्री अविनाश सातपुते,

नेमणुक जिल्हा विशेष शाखा नांदेड, श्री जमील इस्माईल सय्यद, सेवानिवृत राखीव पोलीस उप निरीक्षक व श्री खामराव रामराव वानखेडे, सहा. पोलीस उपनिरीक्षक नेमणुक वाचक शाखा पोलीस अधिक्षक कार्यालय नांदेड यांना प्रदान करण्यात आले.

सदर पदक प्राप्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पोलीस उपमहानिरीक्षक नांदेड परिक्षेत्र नांदेड श्री निसार तांबोळी,

व पोलीस अधिक्षक नांदेड श्री प्रमोदकुमार शेवाळे, अपर पोलीस अधिक्षक नांदेड श्री निलेश मोरे, अपर पोलीस अधिक्षक भोकर

श्री विजय कबाडे, पोलीस उप अधिक्षक (मु.) नांदेड डॉ. अश्विनी जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी नांदेड शहर श्री चंद्रशेन देशमुख, डॉ. सिध्देश्वर भोरे, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा नांदेड

श्री द्वारकादास चिखलीकर पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा नांदेड श्री प्रशांत देशपांडे, श्री नानासाहेब उबाळे व सहा पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क अधिकारी श्री शिवाजी लष्करे तसेच नांदेड जिल्हयातील इतर सर्व पोलीस अधिकारी

व अंमलदार यांनी त्यांच्या या उत्कृष्ट व उल्लेखनिय कामगीरी बदल अभिनंदन केले आहे.